


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570 डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : ०७४ ● पुणे ● मंगळवार, दि. २८ जानेवारी २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



'गुलियन' पसरतोय 3



फरार सुशांत कुटे गजाआड 4

# घरफोडी करणारा आंतरराज्यीय अट्टल गुन्हेगार जेलबंद

## १६ लाखांहून अधिकचा मुद्देमाल हस्तगत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहरामध्ये चोरीच्या घटनांना काही वेग लागायचे नावच घेत नाहीये त्याचबरोबर पुणे शहरामध्ये चोरी करणारे अट्टल चोर तर आहेच पण त्याचबरोबर बाहेरच्या राज्यातून येणारे चोर देखील आता पुण्यामध्ये येऊन चोरी करत आहे म्हणूनच पुणे शहर पोलीस प्रशासनाच्या डोकेदुखी मध्ये वाढ होताना दिसून येत आहे.

तरीही पोलीस प्रशासन चोरांना धडा शिकवण्याचे कार्य करत आहेत. गुजरात कर्नाटक आणि महाराष्ट्र राज्यात ठिकठिकाणी चोरी घरफोड्या करणाऱ्या एका अट्टल गुन्हेगाराला पुणे पोलीस प्रशासनाने अटक केलेली आहे. या केलेल्या कामगिरीमुळे पोलीस प्रशासनाचे कौतुक देखील करण्यात येत आहे.

एका अट्टल आंतरराज्यीय गुन्हेगाराला पकडण्याचे धाडस स्थानिक गुन्हे अन्वेषण ग्रामीण शाखेच्या पोलिसांनी केलेले आहे. ही कारवाई पुणे सातारा रोडवरील सासेवाडी परिसरात करण्यात आलेली आहे. या अट्टल गुन्हेगाराकडून पोलिसांनी रोख रक्कम आठ तोळे सोन्याचे दागिने, दोन किलो चांदीची भांडी असे तब्बल 16 लाख रुपये पेक्षा जास्त ऐवज जप्त केलेला आहे.

या कारवाईत अटक करण्यात आलेल्या या चोराचे नाव लखन अशोक कुलकर्णी ऊर्फ सचिन राजू माने असे आहे. आरोपी लखन कुलकर्णी वर आतापर्यंत गुजरात कर्नाटक महाराष्ट्रात राज्यात 50 पेक्षा अधिक गुन्हे दाखल करण्यात आलेले आहे. त्याचबरोबर लखनने कर्नाटक शहरात चोरी केलेल्या प्रकरणात सात वर्ष शिक्षा देखील भोगलेली होती, तरीही या चोराने अन्य राज्यांमध्ये चोरी करण्याचे प्रयत्न सुरूच ठेवले आहेत अशी माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

या पकडलेल्या चोरामुळे भविष्यात अनेक माहिती मिळण्याची मदत देखील होईल त्याचबरोबर महाराष्ट्र राज्यात तसेच राज्य बाहेर चोरांचे वाढलेले कनेक्शन व नेटवर्क यांची माहिती देखील मिळेल असे देखील प्रतिपादन पत्रकार परिषदेत पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी दिली.

13 जानेवारी रोजी पहाटे भोर शहरात श्रीपती नगर मध्ये चार घरांचे अज्ञात चोरट्याने कुलक तोडून घरातील रोकड व सोने-चांदी लंपास केले होते. या संदर्भातील तक्रार माधव पुरोहित यांनी भोर पोलिस ठाण्यामध्ये केली होती त्यानुसारच पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी सीसीटीव्ही फुटेज द्वारे माहिती मिळवून चोर ज्या ज्या ठिकाणी गेले होते त्या ठिकाणी सापळा असून पोलिसांना चोरांना पकडण्यात यश आलेले आहे. एकंदरीत 26 लाख 35 हजार रुपयांचा मुद्देमाल चोरांनी लंपास केलेला होता व त्यानंतर चोराला पकडल्यानंतर चोराकडे अधिक रोकड त्याचबरोबर सोने चांदी च्या वस्तू देखील सापडल्या आहेत. पोलीस याप्रकरणी अधिक तपास देखील करत आहेत. भोर शहरातील ग्रामस्थांकडून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाचे कौतुक करण्यात येत आहे.



**सदरची कामगिरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, भोर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आण्णासाहेब पवार, गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक दत्ताजीराव मोहिते, अंमलदार बाळासाहेब खडके, अमोल शेडगे, मंगेश भगत, महेश बनकर, मंगेश थिगळे, विजय कांचन, धिरज जाधव, अजित भुजबळ, काशिनाथ राजापुरे, केतन खांडे, अतुल मोरे यांनी केली. आरोपीस न्यायालयात हजर करून पोलीस कोठडी घेण्यात आलेली आहे.**

## ठळक बातम्या

### पुणेकरांना दिलासा..!

**पुणे : (आरंभ पर्व): 'गुइलेन बॅरे सिंड्रोम' च्या रुग्णावर महापालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयात मोफत उपचार होणार आहेत. तसेच खासगी रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांना शहरी गरीब योजनेंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतची मदत केली जाईल. या आजाराच्या रुग्णांसाठी 'इम्युनोग्लोब्यूलिन' हे इंजेक्शन मोफत उपलब्ध करून दिले जाणार आहे. 'जीबीएस'ची पुण्यातील रुग्णसंख्या वाढत आहे. या आजारावरील उपचार खर्चिक असल्याने महापालिकेने पुणेकरांना उपचारासाठी आर्थिक मदत करावी, अशी सूचना केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केली. त्यावर महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी हे निर्णय घेतले आहेत. 'जीबीएस'वर कमला नेहरू रुग्णालयात मोफत उपचार केले जाणार आहेत.**

### अजितदादांच्या निकटवर्तीयावर कारवाई होणार का?

**पिंपरी : (आरंभ पर्व) : बांधकाम व्यावसायिकाला मारहाण केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल झाला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निकटवर्तीय बाबुराव चांदेरे यांच्यावर याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. मुळशी तालुक्यातील सुसगाव येथे तीर्थ डेव्हलपर्सच्या मालकीचा सर्व्हे क्रमांक २७३ येथे शनिवारी (दि. २५) ही घटना घडली. प्रशांत शंकर जाधव (४८, रा. वारजे माळवाडी, पुणे) यांनी याप्रकरणी बावधन पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. बाबूराव चांदेरे व त्याचे दोन ते तीन साथीदारांच्या विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला. तीर्थ डेव्हलपर्सचे विजय रौंदळ असे मारहाण झालेल्या बांधकाम व्यावसायिकाचे नाव आहे.**

### राज्य लॉटरी चालू ठेवण्याच्या हालचाली

**मुंबई : (आरंभ पर्व) : महाराष्ट्र राज्य लॉटरी बंद करण्यात येणार असल्याचे वृत्त 'लोकमत'ने दिल्यानंतर हजारो लॉटरी विक्रेत्यांनी या निर्णयाला विरोध दर्शविला. आता ही लॉटरी बंद करण्याच्या प्रस्तावावर वित्त विभाग फेरविचार करणार आहे. लॉटरी सुरू करण्यासाठी काय करता येईल, यावर विभाग विचार करत आहे असे वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी सोमवारी सांगितले. लॉटरी विक्रेत्यांच्या संघटनेचे पदाधिकारी उपमुख्यमंत्री व वित्त मंत्री अजित पवार यांना भेटले आणि लॉटरी बंद करू नका, अशी मागणी केली. पवार यांनी आम्हाला पुढील आठवड्यात चर्चेला बोलावतो, असे आश्वासन दिले आहे, असे लॉटरी विक्रेत्यांचे नेते विलास सातर्डेकर यांनी सांगितले. केरळसारख्या राज्यांमध्ये तेथील राज्य लॉटरी कशी चांगल्या पद्धतीने चालविली जाते, याचा अभ्यास करण्यासाठी वित्त विभागाच्या काही अधिकाऱ्यांना पाठविले जाण्याची शक्यता आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री विजय गोयल यांनी जून २०१९ मध्ये राज्यसभेत बोलताना लॉटरीवर देशभरात बंदी आणण्याची मागणी केली होती. प्रत्येक राज्य सरकारांना त्यांनी तसे निवेदनदेखील पाठविले होते.**

# वारकरी परंपरेला बट्टा

## महाराजाने केले शाळकरी मुलीवर अत्याचार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वारकरी संप्रदायाला एक वारसा आहे. संस्कृती परंपरा आहे. वारकरी संप्रदायातील चांगल्या गोष्टींचे प्रचार प्रसार करण्याचे कार्य महाराज करत असतात. आपल्या ज्ञानाने, कीर्तनाने नवीन वारकरी घडविण्याचे कार्य महाराज मंडळी करत असतात पण पुणे शहरात चक्क संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या आळंदीत भागवत धर्माला तडा जाईल अशी एक घटना घडली आहे. घडलेल्या या घटनेमुळे संपूर्ण वारकरी समाजातून निषेध व्यक्त केला जात आहे. पिंपरी चिंचवड भागामध्ये चक्क आळंदीतील वारकरी शिक्षण संस्थेच्या एका तेरा वर्षीय मुलीवर विनयभंग केल्याचा आरोप महाराजांवर करण्यात आलेला आहे. या घटनेचा छडा लागताच पोलिसांनी या महाराजाला त्वरित अटक केलेली आहे. आपल्या सर्वांना माहितीच आहे की, आळंदी येथे नवीन पिढीला कीर्तनाचे धडे शिकवले जातात आळंदी येथे एका महाराजांनी तेरा वर्षाच्या अल्पावयीन मुलीवर विनयभंग केल्याची घटना घडलेली आहे. हा महाराज गेल्या चार महिन्यापासून या मुलीचे विनयभंग करत होता तसेच वेगवेगळ्या प्रकारे अत्याचार करून शोषण करत होता.

# कर्नलवाडी येथील एका युवकाकडून आत्मदहनाचा प्रयत्न

**सासवड (दै. आरंभ पर्व)**

26 जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त एक घटना समोर आलेली आहे. भोर पुरंदर उपविभाग पोलीस अधिकारी यांच्या कार्यालयासमोर एका युवकाने आत्मदहनाचा प्रयत्न केलेला आहे, यामुळे सुरक्षा यंत्रणा तसेच आजूबाजूच्या परिसरामध्ये खळवजनक वातावरण निर्माण झालेले आहे. 26 जानेवारी च्या दिवशी सगळीकडे प्रजासत्ताक दिवस थाटामाटात साजरा करत असतानाच या घटनेमुळे शासकीय कामकाजात अडथळा निर्माण झाला.

अंकुश उमाजी वाघापुरे आत्मदहन करणाऱ्या युवकाचे नाव आहे. या घटने प्रकरणी दत्तात्रय शांताराम खेंगरे पोलीस हवालदार यांनी या तरुणाविरुद्ध तक्रार दाखल केलेली आहे.




आत्मदहनाचा प्रयत्न केल्यामुळे सासवड पोलीस स्टेशनमध्ये या युवका विरोधात अनेक कलम अंतर्गत दत्तात्रय शांताराम खेंगरे यांनी हा गुन्हा दाखल केलेला आहे. सासवड या ठिकाणी नऊ वाजता उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या समोर मोकळ्या जागेत या युवकाने विषारी औषध प्राशन करून स्वतःचा तसेच इतरांचा देखील जीव धोक्यात घातलेला आहे, असे कृत्य केल्याने मानवी जीवित हानी होईल असे कृत्य करण्याचा प्रयत्न या तरुणांनी केला आहे आणि म्हणूनच आजूबाजूच्या व्यक्तींना भयभीत करण्याचा प्रयत्न करणे तसेच शासकीय कामकाजामध्ये अडथळा निर्माण करणे अशा विविध गुणांच्या कलमांच्या अंतर्गत या व्यक्तीवर गुन्हे दाखल करण्यात आलेला आहे.

एकंदरीत या युवकाने आत्महत्या करण्यामागे नेमकी काय कारण आहे याचा तपास देखील पोलीस अधिकारी करत आहे. या घटने संदर्भातील पुढील तपास सासवड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार सूर्यकांत गायकवाड करत आहेत. घडलेल्या प्रकार हा दुर्दैवी असला तरी आत्मदहन करणे, हे चुकीचे आहे आणि म्हणूनच भविष्यात असे कृत्य होऊ नये याकरिता या युवकाविरुद्ध गंभीर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.









# अबोला धरणाऱ्यांना आपली कधीच गरज पडणार नाही?

अनेक कौटुंबिक समस्या घेऊन लोकं जेव्हा समुपदेशनाला येतात तेव्हा बहुतांश घरातील लोकांची समस्या असते ती म्हणजे घरातील नातेवाइकांचा अबोला! कुटुंब मोठं असो छोटं असो रुसवे-फुगवे, वादविवाद, मतभेद हे असतातच. अनेक समजूतदार घरामध्ये, चांगले विचारविनिमय असलेल्या घरातील सदस्यांमध्ये घरातील सर्व समस्या, अडचणी एकमेकांना विश्वासात घेऊन, धीर देऊन, आधार देऊन, मदत करून, चर्चा करून सोडवल्या जातात. तर अनेक घरांमध्ये जिथे लोकांची मनस्थिती कमकुवत आहे, विचार करण्याची, परिस्थिती समजावून घेण्याची कुवत नाही त्याठिकाणी एकमेकांना दोष देऊन, कोणावरही खापर फोडून, एकमेकांना टोमणे मारून, अबोला धरून, भांडणे करून, लपवा-छपवी करून, निंदा-नालास्ती करून, अधिक गैरसमज पसरवून घरातलेच लोक घरातल्या आपल्याच माणसांना बदनाम करण्यात धन्यता मानतात.

ज्या घरामध्ये सतत एकमेकांना अंधारात ठेवलं जातं, सत्य लपवलं जातं, एकमेकांशी व्यवस्थित संवाद साधला जात नाही, सतत दिशाभूल केली जाते, माघारी बोललं जातं, जिथे सतत घरात राजकारण, कुटनीती, संभ्रम, संशय आरोप-प्रत्यारोप याच गोष्टींचा साम्राज्य असतं ते घर आणि ती माणसं कधीच प्रगती करू शकत नाहीत. हे समुपदेशनाच्या प्रकरणातून लक्षात येते. अनेक घरातील लोकांना आपल्याशी कोणी अबोला धरला, व्यवस्थित बोललं नाही, चांगलं वागलं नाही, आपल्याला एकटं पाडलं आहे याचा खूप त्रास होतो. जे लोकं मनाने हळवे असतात, भावनांशील असतात, सगळ्यांना आपले जवळचे मानणारे आणि नात्यावर विश्वास ठेवणारे असतात, ज्यांना कुटुंब तुटू नये असं वाटतं असतं त्यांना असे चुकीचे वाईट अनुभव आल्यावर खूप त्रास होतो, मनस्ताप होतो आणि त्यांच खूप खच्चीकरण होत आहे अशी त्यांची तक्रार असते. घरातलीच लोकं आम्हाला वेगळी, परकी वागणूक देतात, घरात ग्रुप केलेले आहेत, घरात एकोपा, एकजूट नाहीये याचा त्यांना त्रास होत असतो. यामुळे घरात सतत धुसफूसणारं वातावरण असतं. मनमोकळे, प्रसन्न, आनंदी कोणीच नसतं, सगळेच मनात कुढत असतात आणि तरीही एकमेकांना त्रास देत असतात. अनेक लोकं सांगतात की आमच्याच घरात काय चाललंय ते आम्हाला माहिती नसतं. काही घडो अथवा न घडो अचानक आम्हाला वेगळं एकटं पाडलं जातं, काही सदस्य आमच्याशी बोलणं बंद करतात, आमचे फोन घेत नाहीत, समोर आले तरी आम्हाला प्रतिसाद देत नाहीत, मोबाईलवर आम्ही कितीही चांगलं बोलण्याचा प्रयत्न केला, त्यांना चांगला मेसेज पाठवला तरी त्यातून आम्हाला उलटंच बोललं जात, अर्थाचा अनर्थ केला जातो किंवा काहीच प्रतिसाद मिळत नाही.



आजकाल तर मोबाईलला एकमेकांना ब्लॉक करणे, ब्लॅक लिस्टला टाकणं यामुळे मनस्तापात अधिक भर पडली आहे. आता लोकं अशी का वागतात हे समजावून घेऊ आणि त्यांच्या या वृत्तीचा आपण का आणि किती त्रास करून घ्यायचा? हे आपल्यावर कसं अवलंबून आहे हे पण पाहू. यामध्ये सगळ्यात महत्त्वाचे आहे ज्यांना तुम्ही आपलं म्हणत आहात, नातेवाईक म्हणत आहात, जवळचे समजत आहात, ज्यांच्यात तुम्ही गुंतलेले आहात ते खरंच तुम्हाला आपलं मानतात का? ते तुमचे आहेत का? त्यांना पण तुमच्याबद्दल तेवढंच प्रेम, ओढ, आदर, आपुलकी, जिव्हाळा आहे का? हे सगळं फक्त बोलून आहे की कृतीतून ते सिद्ध होत आहे हे जाणून घ्या. कोणतंही नातं दोन्हीकडून सारखं योगदान असेल तरच टिकू शकत, बहरू शकतं हे व्यवस्थित तपासून त्या व्यक्तीला तेवढंच महत्त्व द्या. जे तुम्हाला आपलं मानत नाहीत त्यांच्याकडून अपेक्षा करणं पूर्णपणे सोडून द्या. तुमच्याशी कोणी कोणत्याही कारणास्तव बोलत नाहीये किंवा बोललं तरी त्याच्या बोलण्यात राग, द्वेष, तिरस्कार, वाद घालण्याची वृत्ती, ओरडाआरडा करून स्वतःचं खरं करण्याची प्रवृत्ती आहे, अशा लोकांना शांतपणे एक-दोन वेळा समजावून घेण्याचा आणि समजावून सांगण्याचा प्रयत्न करून बघा. त्यानंतर पण त्यांच्यात काहीच सुधारणा होत नसेल तर ते आणि त्यांचा स्वभाव बदलण्यापलीकडे आहे असं समजून विषय सोडून द्या, पण स्वतःला त्रास करून घेऊ नका. अशा लोकांच्या गावी पण नसतं की त्यांच्या वागणुकीमुळे तुम्हाला किती त्रास होत आहे. लोकं असं का वागतात हे पहिले समजावून घ्या. असे वागणाऱ्या लोकांची शैक्षणिक पात्रता प्रथम लक्षात घ्या. शिक्षणाने माणसाचे व्यक्तिमत्त्व घडते, विचार, आचार प्रगल्भ होतात, सकारात्मक विचारशैली जागृत होते. त्या व्यक्तींचा सामाजिक आयुष्य लक्षात घ्या. ते समाजात कोणत्या स्थानावर आहेत, किती आणि कशा प्रकारच्या बुद्धिमान, कर्तृत्ववान, अनुभवी आणि हुशार लोकांच्या सहवासात ते कामं करतात, बोलतात, राहतात हे जाणून घ्या. अशा वागणाऱ्या लोकांचं बालपण, पूर्व आयुष्य समजावून घ्या. त्यांनी स्वतःच्या विकासासाठी, स्वतःला बदलण्यासाठी, स्वतःला अधिक समृद्ध बनवण्यासाठी किती वेळ दिला आहे यावर विचार करा.

## ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान सप्तरंगी कला प्रदर्शनाचे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कला, भारतीय संस्कृती आणि पर्यावरणाला समर्पित हिसारच्या , टैलेंटिला फाउंडेशन या सामाजिक संस्थेने पुण्यातील यशवंतराव चव्हाण आर्ट गॅलरीमध्ये 31 जानेवारी ते 2 फेब्रुवारी 2025 दरम्यान एक समूह कला प्रदर्शन 'सप्तरंगी' आणि सन्मान समारंभाचे आयोजन केले आहे.



सप्तरंगी कला प्रदर्शनाचे उद्घाटन भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्या प्रमुख उपस्थितीत 31 जानेवारी रोजी होणार आहे. या कला प्रदर्शनात देश-विदेशातील प्रसिद्ध कलाकार हरिप्रिया नरसिंहान, सोनल सक्सेना, मोनिता ढींगरा, केदारनाथ भागवत, राखी कुमारी, दत्तात्रय खेळकर, सुधीर करणडे, अर्चना श्रीवास्तव, रचना सिंह, हेरिबेर्टो नोपनी, नरेंद्र गंगाखेडकर, सतीश पोटदार, धात्री थानकी, कारमेला न्यूनेज, संजय उमरानीकर, निहारिका श्रीवास्तव, जयश्री पाटील, क्रेजेंटा कदम, आर्या कुलकर्णी, माधुरी गयावाल, विनय जोशी, हीरालाल गोहिली, प्रीती राऊत, विभावरी देसाई, इशिता रामाप्रसाद, अंजन रॉय, सोलेदाद बुरगालेता इत्यादी त्यांच्या कलेचे प्रदर्शन करतील. या आर्ट प्रदर्शनीत देश-दुनियेस विविध कलाकृतींचे प्रदर्शन केले जाणार आहे. महत्वाचे म्हणजे, टैलेंटिला फाउंडेशनने पूर्वीही अनेक कला प्रदर्शने, कार्यशाळा आणि सेमिनार आयोजित केले आहेत आणि देश-विदेशातील कलाकृती प्रदर्शित केले आहेत.

टैलेंटिला फाउंडेशनच्या संस्थापक आणि संचालक अनुराधा खरे आणि विनीत खरे यांनी सांगितले की, टैलेंटिला फाउंडेशनद्वारे पुण्यातील हे दुसरे कला प्रदर्शन आहे. या कला प्रदर्शनात विविध प्रकारच्या कलांचे प्रदर्शन केले जाणार आहे, ज्यामध्ये देशातील प्रसिद्ध कलाकार संजय उमरानीकर, मोनिता ढींगरा, विभावरी देसाई, केदारनाथ भागवत आर्ट डेमो देतील आणि सर्व कलाकारांना सन्मानित केले जाईल. हे प्रदर्शन 31 जानेवारी ते 2 फेब्रुवारी दरम्यान दुपारी 12 ते रात्री 8 पर्यंत सुरू राहणार असून सर्वांना मोफत प्रवेश दिला जाणार आहे.



## इम्युनोग्लोब्यूलिन इंजेक्शन मोफत द्या : मोहोळ यांचे आदेश

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गुलियन बॅरी सिंड्रोमच्या (जीबीएस) रुग्णांसाठी महापालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयात मोफत उपचार होणार आहेत. तर खासगी रुग्णालयातील रुग्णांना 'शहरी गरीब योजने'तून दोन लाख रुपयांपर्यंतची मदत केली जाणार आहे. या आजारासाठी दिले जाणारे 'इम्युनोग्लोब्यूलिन' हे इंजेक्शन मोफत उपलब्ध करून दिले जाईल, अशी माहिती केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली. 'जीबीएस'च्या वाढत्या रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर मोहोळ यांनी महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, आरोग्य प्रमुख डॉ. नीना बोराडे यांच्याशी चर्चा करून आढावा घेतला. त्यावेळी या आजारावरील उपचार महाग आहेत त्यामुळे महापालिकेने पुणेकरांना उपचारांसाठी आर्थिक मदत करावी' असे मोहोळ यांनी दिले आहेत.

## थोडक्यात



### डॉ. वनिता काळभोर यांचे ध्वजारोहण

**लोणी काळभोर (आरंभ पर्व) : पूर्व हवेली डॉक्टर्स असोसिएशनच्या रणरागिनी डॉ. वनिता रतन काळभोर यांनी प्रजासत्ताक दिना निमित्त भैरवगडावर ध्वजारोहण केले. महाराष्ट्रातील सर्वात खडतर अशा समजल्या जाणाऱ्या ट्रेकमधील मोरोशीचा भैरवगड हा एक आहे गडाची उंची समुद्रसपाटीपासून 3656 फूट आहे. या ट्रेकमध्ये तीव्र स्वरूपाचे चढण(climbing )चढावे लागते , तसेच रॅपलिंग म्हणजे फक्त दोरखंडाच्या सहाय्याने प्रवास करावा लागतो, एवढ्या उंचीवर हे सर्व करत असताना आपल्या सहनशक्तीचा कसच लागतो. चहू बाजूने घोंघावणारा जोराचा वारा, निमुळती पायवाट, हाताने धरण्यास जागा नसणे,दगडाकडे तोंड करून पुढे जाण्यासाठी कशीबशी जागा शोधणे, वरून दगड- माती ढासळत असताना स्वसंरक्षण करत चढणे अशा प्रकारच्या संकटावर मात करत डॉक्टरांनी हा ट्रेक पूर्ण केला. पूर्वीच्या काळी महाराजांनी शत्रूवर लक्ष ठेवण्यासाठी 'टेहळणी' स्वरूपात याचा उपयोग करून घेतला , येथे पाण्याच्या दोन पाण्याच्या टाक्या आहेत. 'सह्याद्री संजीवनी' या संस्थेमार्फत दिनांक २६ -०१- २०२५ रोजी पूर्ण भारतभरातील पंधरा ते वीस गिर्यारोहकांनी या मोहिमेत भाग घेतला होता. यातच डॉ. वनिता काळभोर यांनी भारताचा ध्वज फडकावत मोहीम फत्ते करून पुर्व हवेली डॉक्टर असोसिएशनच्या मानाच्या तुऱ्यात अजून एक तुरा जमा केला याबद्दल डॉ. वनिता रतन काळभोर यांचे सर्व स्थरातुन अभिनंदन केले जात आहे.**

### दारूसाठी पैसे न दिल्याने आई आणि भावावर हत्याराने वार

**पुणे (आरंभ पर्व) : दारूसाठी पैसे देण्यास नकार दिल्याने एकाने आई आणि भावावर कोयत्याने वार केल्याची घटना सेनापती बापट रस्ता परिसरात घडली. या प्रकरणी चतु:श्रृंगी पोलिसांनी तरुणाला अटक केली आहे. गणेश अरुण जाधव (वय २८, रा. रामोशीवाडी, गोखलेनगर) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याबाबत गणेशचा भाऊ दिगंबर (वय ३५) यांनी चतु:श्रृंगी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेशने शनिवारी आईकडे दारू पिण्यासाठी पैसे मागितले. परंतु आईने त्याला पैसे देण्यास नकार दिला. त्यामुळे त्याने आईला शिवीगाळ करून मारहाण केली. त्यावेळी भाऊ दिगंबर भांडण सोडविण्यासाठी गेला. तेव्हा गणेशने भावावर लोखंडी हत्याराने वार केला. त्यावेळी मध्यस्थी करणाऱ्या आईच्या डोक्यातही हत्याराने वार केला. या हल्ल्यात दिगंबर आणि त्यांची आई दोघे गंभीर जखमी झाले. पोलिस उपायुक्त हिम्मत जाधव, सहाय्यक आयुक्त विठ्ठल दबडे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजयानंद पाटील घटनास्थळी दाखल झाले.**



## स्पोर्ट्स मॅनियाचा सलग दुसरा पराभव

- **एआयएफएफ एलिट युथ लीग फुटबॉल**
- **'होम' सामन्यात झिंक एफएकडून 1-4 असा पराभव**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

स्पोर्ट्स एरिना टर्फ, वाकड येथे झालेल्या एआयएफएफ एलिट युथ लीगच्या राउंड 8 सामन्यामध्ये स्पोर्ट्स मॅनियाला ग्रुप टॉपर्स झिंक फुटबॉल ॲकॅडमीकडून 1-4 असा पराभव पत्करावा लागला. घरच्या मैदानावरील (होम गेम) त्यांचा हा पहिला पराभव आहे.

ग्रुप-एच सामन्यात स्पोर्ट्स मॅनियाला लीगमधील दुसऱ्यांदा पराभवाला सामोरे जावे लागले. या महिन्याच्या सुरुवातीला 'अवे लेग' गेम गमावल्यानंतर झिंक फुटबॉल अकॅडमीविरुद्धची हार हा दुसरा पराभव होता.

झिंक एफएच्या निखिल गोपेच्या (पहिले मिनिट) सुरेख गोलमुळे स्पोर्ट्स मॅनिया सुरुवातीला बॅकफूटवर फेकला गेला. पाच मिनिटांनंतर पृथ्वीराज पाटीलने (6व्या) स्पोर्ट्स मॅनियाला बरोबरी साधून दिली. त्यामुळे मध्यंतराला (हाफ टाईम) 1-1 अशी बरोबरी होती.

उत्तरार्धाच्या सुरुवातीला हिमांशूने (47व्या) झिंक एफसीला (2-1) आघाडीवर नेले. तीन मिनिटांनंतर हिमेश मीनाने (५०व्या मिनिटाला) आघाडी (३-१) आणखी वाढवली. हिमेश मीनाने (६५व्या मिनिटाला) एका गोलची भर घालत झिंक एफसीला 4-1 अशा फरकाने जिंकून दिले. या पराभवानंतरही स्पोर्ट्स मॅनिया 16 गुणांसह (2 पराभव, 1 अनिर्णित) गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर आहे. अव्वल स्थानी असलेल्या झिंक एफएच्या खात्यात 24 गुण आहेत. लीगमध्ये आणखी दोन राऊंड शिल्लक असून पुढील 'अवे' सामन्यात महाराष्ट्र ओरांजे एफएशी दोन हात करेल.

## तरुणांनी उद्योग व्यवसायाला प्राधान्य द्यावे - प्रवीण गायकवाड





**• राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत बोलताना संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष प्रवीण गायकवाड. (छायाचित्र : किरण खुडे , राजगुरूनगर) •**

**राजगुरुनगर : किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

एकविसावे शतक अर्थकारणाचे असून तरुणांनी जगाच्या स्पर्धेत टिकण्यासाठी राज्य व देशाच्या सीमा ओलांडून जग जिंकायला बाहेर पडावे आणि आर्थिक सक्षमीकरणासाठी उद्योग व्यवसायाला प्राधान्य द्यावे असे आवाहन संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष प्रवीण गायकवाड यांनी केले. ते खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत बोलत होते.

याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब, टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, हिरामण सातकर, सतीश नाईकरे, ॲड. सर्जेराव पानसरे, दिलीप मेदगे, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ.एच.एम.जरे, प्रबंधक के. आर. पाचारणे आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

प्रवीण गायकवाड पुढे म्हणाले की आरक्षणाच्या माध्यमातून जातीजातीत द्वेष निर्माण झाला असून वस्तुस्थितीचा विचार व्हायला हवा. सरकारी धोरणे आणि खासगीकरणामुळे नोकऱ्यांची संख्या कमी झालेली आहे. इतिहास हा वर्तमानात राहण्यासाठी नाही तर भविष्याचा वेध घेण्यासाठी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी तंजावर ते पेशावर असे जे स्वराज्यविस्ताराचे स्वप्न पाहिले होते तसे तरुणांनी ध्येय निश्चित करून जग जिंकण्यासाठी बाहेर पडायला हवे असे आवाहन त्यांनी केले. तरुणांनी आर्थिक सक्षम झाल्यावर समाजकारण व राजकारणाचा विचार करावा. त्यासाठी आर्थिक साक्षरता गरजेची असल्याचे ते म्हणाले.

सूत्रसंचालन डॉ. बी.डी. अनुसे यांनी, परिचय प्रा. के.जी. मेदगे आणि आभार श्रुतिका वाळुंज या विद्यार्थीनीने मानले.

## 'इको ग्लॅम्पिंग महोत्सव महाराष्ट्र'ची नाशिकमध्ये सुरूवात : संस्कृती, शाश्वतता आणि साहसाचा मेळ

**नाशिक (दै. आरंभ पर्व)**

बहुप्रतीक्षित 'इको ग्लॅम्पिंग महोत्सव महाराष्ट्र – नाशिक'च्या अधिकृतपणे सुरुवात झालेली आहे! महाराष्ट्र पर्यटनाद्वारे आयोजित या महोत्सवाचे उद्घाटन आज मा. डॉ. प्रवीण गेडाम, भा.प्र.से., विभागीय आयुक्त, नाशिक विभाग; मा. डॉ. बी. एन. पाटील, भा.प्र.से., संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र शासन; मा. श्री. जलज शर्मा, भा.प्रा. से., जिल्हाधिकारी, नाशिक; श्रीमती अशिमा मित्तल, भा.प्रा.से., प्रमुख कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि श्रीमती मधुमती सरदेसाई, उपसंचालिका - नाशिक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या प्रमुख उपस्थितीत व संस्कृती, शाश्वतता आणि साहसाच्या जल्लोषात करण्यात आले. १७ जानेवारी ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत चालणाऱ्या या महोत्सवात नाशिकमधील गंगापूर धरण बॅकवॉटरचे विलोभनीय सौंदर्य अनुभवण्यासाठी जगभरातील पर्यटकांना आमंत्रित करण्यात आले आहे.



इको ग्लॅम्पिंग फेस्टिव्हल महाराष्ट्र - नाशिकच्या अल्टिमेट इको एस्केपचे उद्घाटन करताना नाशिक विभागाचे माननीय विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम (भा.प्र.से.) म्हणाले, "हा उपक्रम पर्यटन आणि सामुदायिक विकासाचा उत्तम मिलाफ आहे. इको ग्लॅम्पिंग महाराष्ट्र हा महोत्सव केवळ नाशिकच्या निसर्गसौंदर्याचे दर्शन घडवत नाही, तर रोजगाराच्या संधी तसेच पारंपारिक हस्तकला आणि प्रथांना प्रोत्साहन देऊन स्थानिक समुदायांना सक्षम करतो. हे खऱ्या अर्थाने सर्वांगीण विकासाच्या दिशेने टाकलेले पाऊल आहे."

महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन संचालनालयाचे संचालक डॉ. बी. एन. पाटील (भा.प्र.से.) म्हणाले, "इको ग्लॅम्पिंग महाराष्ट्र हा केवळ एक कार्यक्रम नाही; महाराष्ट्राची अतुलनीय विविधता आणि पर्यावरणपूरक पर्यटनाची बांधिलकी दाखविण्याची ही संधी आहे. निसर्गाची शांतता आणि ग्लॅम्पिंगची लक्झरी यांची सांगड घालणाऱ्या या महोत्सवात पाहुण्यांचं स्वागत करताना आम्हाला अभिमान वाटतो."

या भव्य उद्घाटनप्रसंगी बोलताना श्री. नाशिकचे जिल्हाधिकारी श्री. जलज शर्मा (भा.प्र.से.) म्हणाले, "नाशिक हे नेहमीच महाराष्ट्राच्या वैविध्यपूर्ण निसर्गाचे आणि संस्कृतीचे प्रतीक राहिले आहे. शाश्वत पर्यटनाला चालना देत असतानाच इको ग्लॅम्पिंग महाराष्ट्र जिल्ह्यातल्या अनोख्या विविधतेवर प्रकाश टाकते. हा कार्यक्रम पर्यटकांवर दूरगामी ठसा उमटवेल आणि जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ म्हणून नाशिकची ख्याती आणखी वाढवेल, असा मला विश्वास आहे."

आरामदायी- आलिशान निवास व्यवस्था, साहसी उपक्रमांचा थरार आणि स्थानिक कला – खाद्यसंस्कृतीचा मेळ असलेला 'महाराष्ट्र इको ग्लॅम्पिंग महोत्सव' भारतातील प्रायोगिक पर्यटनाच्या बाबतीत नक्कीच मैलाचा दगड ठरणार आहे.

महाराष्ट्र शासनाचे पर्यटनमंत्री मा. श्री. शंभूराज देसाई म्हणाले, ""महाराष्ट्र इको ग्लॅम्पिंग महोत्सव हे महाराष्ट्रातील पर्यटनाला नवे रूप देण्याच्या दिशेने टाकलेले धाडसी पाऊल आहे. शाश्वतता आणि स्थानिक वारसा यांवर लक्ष केंद्रित करणारा हा उपक्रम आपल्या राज्याच्या सौंदर्यावर प्रकाश टाकेल आणि आपल्या विविधतेतील एकतेला पाठिंबा देईल."

महाराष्ट्र शासनाचे पर्यटन विभागाचे प्रधान सचिव मा. श्री. अतुल पाटणे (भा.प्र.से.) म्हणाले, "हा महोत्सव म्हणजे जागतिक पर्यटन केंद्र म्हणून महाराष्ट्राची क्षमता ठळकपणे मांडणारा उत्सव आहे. साहसप्रेमींपासून ते संस्कृतीरसिकांपर्यंत प्रत्येकाला आनंद लुटण्याची संधी येथे आहे."पर्यटन संचालनालयाचे संचालक डॉ. बी. एन. पाटील (भा.प्र.से.) म्हणाले, ""महाराष्ट्र इको ग्लॅम्पिंग महोत्सव' हा केवळ एक उपक्रम नव्हे, तर महाराष्ट्राची अतुलनीय विविधता आणि पर्यावरणपूरक पर्यटनाची बांधिलकी दाखविण्याची ही संधी आहे. निसर्गाच्या सहवासात आलिशान सेवा सुविधांनी परिपूर्ण असणाऱ्या या महोत्सवात देशी – विदेशी पाहुण्यांचे स्वागत करताना आम्हाला अभिमान वाटतो."

**तपशील**
**स्थळ: टॉव्हर हाऊसजवळ, गंगापूर धरण बॅकवॉटर्स, नाशिक.**
**निवासव्यवस्था – ६० लक्झरी तंबू आणि पॉड्स.**
**नजिकची विमानतळे - नाशिक आणि शिर्डी**
**हवामान: उल्हासदायी आणि ऊबदार**

सांस्कृतिक देखावे : प्रत्यक्ष पारंपारिक सादरीकरणाचे कार्यक्रम, आदिवासी कला प्रदर्शने आणि छायाचित्रण, पाण्याखालील सागरी जीवनभ्रमंती आणि जैविक शेतीविषयक संवादात्मक कार्यशाळांच्या माध्यमातून प्रशिक्षण देणे.

थरारक साहसी उपक्रम: ॲक्शनपॅक्ड दिवसासाठी जेट-स्की, पॅरासेलिंग, ट्रेकिंग, एटीव्ही राइड्स, पेंटबॉल, सायकलिंग ट्रेल्स आणि डुओ सायकलिंग यांसह इतर क्रीडाप्रकार.

## थोडक्यात




### मनात आणि अंतर्मनात सकारात्मक विचारांची पेरणी होणे गरजेचे : सरश्री

पुणे (आरंभ पर्व) : प्रख्यात आध्यात्मिक गुरु व लेखक सरश्री यांचा "जाणूनबुजून आपला मूड कसा सुधारायचा" हा आध्यात्मिक कार्यक्रम सिंहगड रोड येथील मनन आश्रम येथे मोठ्या उत्साहात पार पडला. हजारोंच्या संख्येने नागरिकांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. यावेळी सरश्री यांनी उपस्थित अनुयायांना मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना ते म्हणाले, की छोट्या छोट्या गोष्टीतून अनेक लोकांचा मूड ऑफ होत असतो. तो मूड सुधारण्यासाठी कोणत्या क्लुप्त्या वापरायच्या, त्याचे तंत्र त्यांनी सांगितले. बरेच लोक मूड चांगला करण्यासाठी आल्याच्या चहाचे सेवन करतात. त्यांचा असा समाज आहे, की आल्याचा चहा प्यायल्याने खराब झालेला मूड देखील चांगला होतो. मात्र मूड चांगला करण्यासाठी मनात आणि अंतर्मनात सकारात्मक विचारांची पेरणी होणे गरजेचे आहे. त्यासाठी नियमितपणे ध्यान करणे गरजेचे आहे. त्याने आपल्या जीवनात आमूलाग्र बदल होतील. मनाची मशागत होणे गरजेचे आहे. मनावरील ताण तणाव कमी करता आला पाहिजे.आजकाल प्रत्येक माणसाला पटकन राग येतो. तो दिसेल त्याच्यावर तो ओरडत असतो. घरात, कार्यालयात, रस्त्यावर म्हणजे सर्वच ठिकाणी रागाचे प्रमाण वाढले आहे ? रागाची व्याप्ती, त्याची कारणे समजून घ्या. राग न येण्यासाठी त्याच्यावरील उपाय काय करायचे, ते समजून घेणे गरजेचे आहे. त्यासाठी तुम्ही स्वतःशी मनन, चिंतन, विचारमंथन, आत्मविश्लेषण करणे गरजेचे आहे. राग हा विनाशी आहे. तो क्षणात विनाशाकडे घेऊन जातो, म्हणूनच रागापासून मुक्त व्हा, त्याशिवाय आपल्याला योग्य दिशा मिळणार नाही.




### 'कीर्तने अँड पंडित' संस्थेतर्फे 'रन फॉर द रिपब्लिक' मॅरेथॉन

पुणे (आरंभ पर्व) : ७६ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित एकात्मता व लोकशाहीचा आनंदोत्सव साजरा करण्याकरिता कीर्तने अँड पंडित संस्थेच्या वतीने 'रन फॉर द रिपब्लिक' मॅरेथॉन २०२५ चे आयोजन केले होते. कर्वे रस्त्यावरील कीर्तने अँड पंडित संस्था, दशभुजा गणपती, करिष्मा सोसायटी चौक, कर्वे रोडने कर्वे पुतळा, शिवाजी महाराज चौक, कर्वे रोडने पुन्हा कीर्तने अँड पंडित या मार्गाने ही मॅरेथॉन झाली. तीन किलोमीटरच्या मॅरेथॉनमध्ये संस्थेतील सर्व पदाधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी शेकडोंच्या संख्येने सहभागी झाले होते. कीर्तने अँड पंडितचे सीए मिलिंद लिमये, सीए पराग पानसरे आदी उपस्थित होते. बाबू बावधने, यश दाते, श्रवण बिश्नोई व धैवत आपटे यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ क्रमांकाने, तर इतर सर्व सहभागींना प्रमाणपत्र व पदक देऊन गौरविण्यात आले. स्नेहा पाटोळे व सहकाऱ्यांनी मॅरेथॉनचे यशस्वी संयोजन केले. सीए मिलिंद लिमये म्हणाले, "लोकशाही उत्सव साजरा करण्यासाठी व सर्वांमधील एकात्मता जपण्यासाठी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने 'रन फॉर रिपब्लिक' मॅरेथॉनचे आयोजन केले होते. संस्थेतर्फे दरवर्षी आजच्या दिवशी सामाजिक उपक्रम आयोजित केला जातो. यापूर्वीही 'मेरा तिरंगा मेरा अभिमान' ध्वज संकलन मोहीम, रक्तदान शिबिर, स्वच्छता अभियान असे विविध उपक्रम राबविण्यात येतात."

### नागरी समस्या सोडवण्यासाठी मानवी साखळी आंदोलन

कर्वेनगर (आरंभ पर्व) : कर्वेनगर परिसरात कचरा, भटकी कुत्री, वाहतूककोंडी, अपूर्ण डीपी रोड अशा अनेक समस्या आहेत. तसेच नदीपात्रातील पूल सुरू होण्याआधी राजाराम पूल ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक हा डीपी रोड पूर्ण करा, या मुख्य मागणीसाठी कर्वेनगर परिसरातील 40 सोसायट्या एकत्र आल्या आहेत. त्यांनी कर्वेनगर संघटित सोसायटी मंच स्थापन केला असून या माध्यमातून प्रयत्न करत आहेत. प्रशासनाने याची गंभीर दाखल घेऊन उपाययोजना कराव्यात यासाठी प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी 2 फेब्रुवारी 2025 रोजी सकाळी सर्व सोसायट्यांचे 1500 हून अधिक नागरिक नागरिक विठेश्वर देवस्थान, डीपी रोड, दुधाने लॉन्स चौक येथे शांततामय मार्गाने मानवी साखळी आंदोलन करणार आहेत.

# 'गुलियन' पसरतोय

## धायरी, किरकटवाडीतील ११ सोसायट्यांना पालिका पुरवणार पिण्याचं पाणी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दूषित पाण्यामुळे गुलियन बॅरी सिंड्रोम (जीबीएस) हा आजार होत असल्याने पुणे महापालिकेतर्फे धायरी, किरकटवाडी मधील सोसायट्यांना पिण्याच्या पाण्याचे टँकर पुरविण्यात येत असल्याचे आज जाहीर केले आहे.

धायरी, किरकटवाडी, नांदेड, नांदोशी यासह अन्य भागात 'जीबीएस'च्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या भागात महापालिकेचे शुद्ध पाणी पुरविले जात नाही, प्रक्रिया न केलेले पाणी घरोघरी जात असल्याने नागरिकांना जुलाब, उलट्या, हातपाय दुखणे असे त्रास सुरू झाले आहेत.

जीबीएस आजार होऊन धायरीतील एका सनदी लेखापाल असलेल्या तरुणाचा दोन दिवसांपूर्वी मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. यानंतर आता पुणे महापालिकेने धायरी, किरकटवाडी ११ सोसायट्यांना पिण्याचे पाणी देण्याची व्यवस्था केली आहे.

यामध्ये डीएसके विश्व, उत्सव, मोरया स्पर्श, पांडुरंग रेसिडेन्सी, कल्पक होम फेज २, अर्बन पार्क, कलम ग्रीन लीफ, आनंदबन, इंगवले पाटील कॉम्प्लेक्स, उज्वल निसर्ग सोसायटी, साई गॅलॅक्सी या सोसायट्यांना टँकर पुरविले जात असल्याचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितले.

दरम्यान, या सोसायट्यांना किती टँकर पाणी दिले जाणार हे जाहीर केलेले नाही.



## मारहाण केल्याप्रकरणी बाबूराव चांदेरेंसह तिघांविरुध्द गुन्हा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक बाबूराव चांदेरे आणि साथीदारांनी बांधकाम व्यावसायिकासह दोघांना मारहाण केल्याची घटना सूसगाव परिसरात घडली. याबाबत बावधन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी प्रशांत शंकर जाधव (वय ४८, रा. वारजे माळवाडी) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रशांत जाधव हे तीर्थ डेव्हलपर्सचे बांधकाम व्यावसायिक विजय रौंदळ यांच्याकडे व्यवस्थापक म्हणून काम करतात. त्यांना २५ जानेवारी रोजी दुपारी काहीजण सूसगाव येथील तीर्थ डेव्हलपर्सच्या जागेवर पोकलंडच्या साह्याने खोदकाम करीत असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे जाधव यांनी खोदकाम करणाऱ्या कामगारांना विचारणा केली. त्यावेळी चांदेरे तेथे आले. त्यांनी जाधव यांच्या कानशिलात मारली. जाधव यांनी फोन करून विजय रौंदळ यांना हा प्रकार कळविला. रौंदळ तेथे आल्यानंतर चांदेरे आणि त्यांच्या साथीदारांनी त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच, दगडाने मारून डोक्यास गंभीर दुखापत केली, असे जाधव यांनी फिर्यादीत म्हटले आहे. याबाबत बावधन पोलिसांनी रात्री गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलिस निरीक्षक तेजस्वी जाधव करीत आहेत.

## इको कार ५०० फूट खोल दरीत कोसळून अपघात

### एक ठार तर, आठ जण जखमी

**भोर (दै. आरंभ पर्व)**

भोर-महाड मार्गावरील वरंधा घाटातील उंबर्डेवाडी (ता. भोर) येथील वळणावरुन महाडकडून भोरच्या दिशेने जाणारी चारचाकी इको गाडी (एमएच १२ युजे ९९५७) अंदाजे 500 फूट खोल दरीत कोसळून सोमवारी (ता. २७) पहाटे चारच्या सुमारास अपघात झाला. अपघातात एकाचा मृत्यू तर, आठ जण जखमी झाले असून सर्व पुण्यातील असल्याची प्राथमिक माहिती आहे. अपघाताचे कारण अजून स्पष्ट झाले नाही. प्राथमिक माहितीनुसार, अपघातात शुभम शिर्के (वय २२ जनता वसाहत, पुणे) यांचा मृत्यू झाला आहे. तर मंगेश गुजर (वय २६, दत्तवाडी), अशोक गायकवाड (वय २९ रा. भवानीपेठ), सिद्धार्थ गणधने (वय २६ रा. दांडेकर पूल), सौरब महादे (वय २२ रा. पर्वती), गणेश लावंडे (वय २७ रा. धायरी) अभिषेक रेळेकर (वय २५ रा. नारायण पेठ), यशराज चंद्रलोकूल (वय २२, घोरपडे पेठ) आणि आकाश आडकर (वय २५ रा. दत्तनगर) अशी जखमींची नावे आहेत. भोर पोलिसांनी घटनास्थळी पोहचून स्थानिक व सह्याद्री बचाव टीमच्या मदतीने जखमींना दरीतून बाहेर काढले असून मृतदेह व जखमींना भोर उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले आहे. दरम्यान, भोर पोलिस ठाण्याचे पोलिस हवालदार राहुल मखरे, सुनील चव्हाण, सागर झेंडे, वारवंडचे पोलिस पाटील सुधीर दिघे, स्थानिक ग्रामस्थ भाऊ उंब्राटकर, विठ्ठल पोळ, नीलेश उंब्राटकर,अक्षय धुमाळ, नीलेश पोळ यांनी घटनास्थळी पोहचून मदत केली.

## नोकरीसाठी पुण्यात तरुणांच्या लागल्या लांबच लांब रांगा

### बेरोजगारीचं भयाण वास्तव !

**पुणे (दै. आरंभ पर्व)**


देशात बेरोजगारीचे प्रमाण मोठे आहे, याचं भीषण वास्तव दाखवणारा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. हा व्हिडिओ पुण्यातील एका आयटी कंपनीच्या मुलाखतीदरम्यानचा असल्याचा दावा केला जात आहे. एका आयटी कंपनीने थेट मुलाखती ठेवली होत्या. यावेळी इच्छूक उमेदवारांनी मुलाखतीसाठी रांगा लावल्या, तब्बलल एक किलोमीटर पर्यंत ही रांग रागल्याचे व्हिडिओत दिसते.

विद्येचे माहेरघर म्हणून पुण्याला ओळखले जाते. पण मागील काही वर्षात पुण्याची 'आयटी शहर' अशी नवी ओळख निर्माण झाली आहे. पुणे आणि परिसरात अनेक आयटी कंपन्या आहेत. विविध राज्यातून अनेक तरुण नोकरीसाठी पुण्याला येत असतात. अशात जर एखाद्या कंपनीने ओपन प्लेसमेंट ठेवले असेल तर त्या ठिकाणी या तरुणांची गर्दी होत असते. नोकरी मिळेल या आशेने राज्याच्या कानाकोपऱ्यातूनच नाही, तर देशभरातून बेरोजगारांनी गर्दी केल्याची माहिती समोर आली आहे. आयटी कंपन्यांमध्ये गेल्या वर्षभरामध्ये मोठी कर्मचारी कपात करण्यात आली होती. आर्थिक मंदीमुळे मोठमोठ्या आयटी कंपन्यांनी फ्रेशर्सच्या भरतीवर बंदी घातली होती. अशातच आता काही कंपन्यांनी पुन्हा भरती प्रक्रिया सुरू केली. आयटी कंपनीत नोकरी करणं सध्या प्रतिष्ठेचं मानलं जातं. परंतू भरतीसाठी ओपनिंग नसल्याने अनेक तरुण तरुणी नोकरीच्या शोधात फिरत आहेत. अशातच सध्या हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. आयटी पदवीधारकांच्या बेरोजगारीची विदारक परिस्थिती या व्हिडीओमध्ये दिसत आहे. वेगवेगळ्या पदांसाठी मुलाखती सुरु असताना त्यासाठी इच्छूक उमेदवारांच्या मोठमोठ्या रांगा पहायला मिळत आहेत. उन्हा तान्हात उमेदवार नोकरीसाठी रांगेत उभा असल्याचं दिसत आहे. रांगेत जवळपास 3000 उमेदवार होते, अशी माहिती सांगण्यात येतीये. कोरोना काळात अनेकांच्या नोकऱ्या गेल्या, आता एआयच्या उदयामुळे देखील नोकऱ्यांमध्ये कपात होणार असल्याचे बोलले जात आहे.

#### काय आहे व्हिडिओत ?

**व्हायरल व्हिडिओमध्ये पहायला मिळतंय की हजारो सॉप्टवेअर इंजिनिअर्स थेट मुलाखतीसाठी रांगेत उभे आहेत. हा व्हिडीओ पुण्यातील मगरपट्टा भागातील असल्याचं बोललं जात आहे पण याची अधिकृत माहिती अद्याप पुढे आलेली नाही. महाराष्ट्र काँग्रेसचे सरचिटणीस आणि मुख्य प्रवक्ते अतूल लोंढे यांनी सोशल मीडियावर हा व्हिडीओ शेअर केला अन् सरकारवर टीका केली आहे.**

## मलाबार गोल्ड अँड डायमंड्सकडून आलिया भट्टसोबत 'सॉलिटेअर वन'ची प्रस्तुती



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जगातील सर्वात मोठ्या आणि सर्वात विश्वासार्ह सोने आणि हिरेजडित दागिन्यांच्या किरकोळ विक्रेत्यांपैकी एक असलेल्या मलाबार गोल्ड अँड डायमंड्सने, आंतरराष्ट्रीय प्रयोगशाळांनी प्रमाणित केलेल्या नैसर्गिक हिऱ्यांचा एक उत्कृष्ट संग्रह 'सॉलिटेअर वन'च्या प्रस्तुतीची आज अभिमानपूर्वक घोषणा केली. बॉलीवूड तारका आणि ब्रँड ॲम्बॅसेडर आलिया भट्टसह या नवप्रस्तुतीसाठी विशेष प्रसारमोहिम आखण्यात आली आहे. ज्यात अनमोल हिऱ्याचे कालातीत आकर्षण साजरे करण्यासह, जीवनातील मौल्यवान क्षणांना प्रकाशित करण्यारी क्षमता प्रदर्शित करण्यासह, या चमकदार रत्नांबद्दल प्रत्येक स्त्रीच्या मनांत असलेले अमीट प्रेम दाखविले गेले आहे.

मोहिमेची सुरुवात आलिया भट्ट अभिनीत एका मोहक चित्रपटाने झाली असून, ज्यात तीन सुंदर गुंफलेल्या प्रेमकथा जिवंत केल्या गेल्या आहेत. दृश्यात्मक विस्मयकारक अशा कथांमध्ये व्यक्तीचे तिच्या जीवनसंगिनीसह, सोलिटियर्स हिऱ्यांत गुंफलेल्या भावनिक जवळीकीसह सखोल नातेसंबंधाच्या प्रवासाला दर्शविले गेले आहे. हे कालातीत दागिने जीवनातील सर्वात विलक्षण क्षणांचे मोहमयी भाग कसे बनतात यावर त्यात भर दिला गेला आहे. आलिया भट्टशी संलग्न असलेली अभिजातता आणि करिष्मा या मोहिमेला इच्छित भावनेची उब देणारा ठरतोच, परंतु "द वन" अर्थात हेच ते अद्वितीय शोधल्याच्या आनंदाला मूर्त रूपही देते. या मोहिमेची संकल्पना डीडीबी मुद्राकडून केली गेली आहे.

मलाबार समूहाचे अध्यक्ष, एमपी अहमद म्हणाले, "'सॉलिटेअर वन'च्या प्रस्तुतीसह, आम्ही केवळ नवीन संग्रहाच्या सादरीकरणापेक्षा बऱ्याच काही गोष्टींची सज्जता केली आहे. हा कालातीत सौंदर्य आणि प्रेमाच्या सामर्थ्याचा अज़ोड उत्सव आहे. या निमित्ताने संकल्पित मोहिमेमध्ये स्त्रियांच्या सॉलिटेअर्स हिऱ्यांशी खोल जुळलेल्या भावनिक संबंधांना दर्शविले गेले आहे, जे लालित्यासह शाश्वतता अशा दोन्ही क्षणांचे प्रतीक बनले आहे. मोहिमेला मिळालेल्या प्रतिसादाने आम्ही हर्षोत्साहित झालो आहोत आणि हे दागिने परिधान करणाऱ्या प्रत्येक स्त्रीची ताकद, लावण्य आणि व्यक्तित्त्वाला दर्शवणारे हे अमोघ ऐवज प्रस्तुत करताना आम्हाला अभिमान वाटतो."

'सॉलिटेअर वन' हे सॉलिटेअर दागिन्यांच्या अनुभवाला पुनर्परिभाषित करण्यासाठी सज्ज झाले आहेत, जे संपूर्ण देशात उपलब्धतेसह, आयुष्यभरासाठी मौल्यवान राहण्याचे वचन देणाऱ्या नैसर्गिक हिऱ्यांच्या उत्कृष्ट श्रेणीला प्रस्तुत करतात. ०.३० कॅरेटपेक्षा जास्त आकाराचा प्रत्येक हिरा आणि दागिन्यांचा प्रत्येक नग द्वि-स्तरीय प्रमाणन प्रक्रियेतून गेलेला असेल, याची खात्री करून आम्ही आमच्या ग्राहकांना सर्वोच्च गुणवत्ता प्रदान करतो.

भारत, आखाती देश, अमेरिका, ब्रिटन, कॅनडा आणि ऑस्ट्रेलियासह १३ देशांमध्ये ३७० हून अधिक शोरूमच्या जागतिक पदचिन्हांसह - मलाबार गोल्ड अँड डायमंड्स दागिन्यांचा विस्तृत संग्रह, अपवादात्मक गुणवत्ता आणि ग्राहक-केंद्रित दृष्टिकोन यासाठी प्रसिद्ध आहे. २६ देशांमधील सुमारे २२,००० बहुभाषिक कर्मचाऱ्यांच्या समर्पित संघाच्या पाठिंब्याने, या नाममुद्रेने जगभरातील १५ दशलक्षाहून अधिक समाधानी ग्राहकांना सेवा दिली आहे.

मलाबार गोल्ड अँड डायमंड्स त्यांच्या "मलाबार प्रॉमिसेस" द्वारे ग्राहकांचे सर्वतोपरी समाधान करणाऱ्या वचनबद्धतेसाठी प्रसिद्ध आहे, ज्यात तपशीलवार खर्च पारदर्शकपणे नमूद असलेली किंमत-पट्टी, सर्व जागतिक शोरूममध्ये उपलब्ध आजीवन मोफत देखभाल सेवा आणि जुन्या सोन्याचे दागिने आणि हिऱ्यांसाठी १०० टक्के विनिमय मूल्य समाविष्ट आहे. कंपनी हे सुनिश्चित करते की, तिचे सर्व दागिने १०० टक्के एचयूआयडी मानकांच्या अनुरूप असतील आणि ग्राहकांना त्यायोगे संपूर्ण पारदर्शकता आणि सत्यतेची खात्री मिळेल. प्रमाणित हिरे गुणवत्ता तपासणीची २८ सूत्री प्रक्रिया पूर्ण करतात आणि प्रत्येक दागिन्यांची खरेदी एक वर्षाच्या मोफत विस्तारित विम्याच्या संरक्षणासह आणि वॉरंटीच्या पर्यायांसह ग्राहकांकडून केली जाते.

**सॉलिटेअर वन त्याच्या नैतिक स्रोतातून पुरवठा झाला असल्याच्या वचनबद्धतेसह, ते जेथून प्राप्त केले ते सत्यापित करणारी पूर्ण साखळीच्या उलगड्यासह, मलाबार वचनांची हमी, २८ सूत्री कठोर गुणवत्ता तपासणी आणि आंतरराष्ट्रीय प्रमाणन यासह ग्राहकांपुढे प्रस्तुत झाले आहे. मलाबार गोल्ड अँड डायमंड्स हे सुनिश्चित करते की सर्व सोने आणि हिरे जबाबदारीने अधिकृत पुरवठादारांद्वारे मिळविले जायला हवेत. शिवाय, मलाबार समूह आरोग्य, गृहनिर्माण, शिक्षण, पर्यावरणीय शाश्वतता, भूकेचे निर्मूलन आणि महिला सशक्तीकरण कार्यक्रमांवर लक्ष केंद्रित करून, अशा सामाजिक दायीत्व (सीएसआर) उपक्रमांसाठी वार्षिक नफ्यातील ५ टक्के योगदान देतो.**

## एम्प्रेस गार्डनमध्ये पुष्प प्रदर्शनास नागरिकांची अलोट गर्दी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एम्प्रेस बोटॅनिकल गार्डन तर्फे 24 ते 27 जानेवारी दरम्यान सुरू असलेल्या पुष्प प्रदर्शनास 26 जानेवारी आणि रविवार सुट्टीचा आनंद घेत नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध प्रकारचे रोपे खरेदी, हुर्डा पार्टी, विविध खाद्याच्या प्रकारावर ताव मारित, फुलांसोबत सेल्फी काढत पुष्प प्रदर्शनाचा आनंद लुटला.

एम्प्रेस बोटॅनिकल गार्डन तर्फे 24 ते 27 जानेवारी 2025 दरम्यान पुष्प प्रदर्शनाचे आयोजन कारण्यात आले आहे. पुष्प प्रदर्शनाच्या तिसऱ्या दिवशी म्हणजेच 26 जानेवारी आणि रविवारची सुट्टी असल्याने नागरिकांनी एकच गर्दी केली होती. 26 जानेवारी निमित्त काही महिलांनी तिरंगा ड्रेस परिधान करून आले होते. सुट्टीचा दिवस असल्याकारणाने पुणे शहरासोबत विविध शहरातील, राज्यातील ऐवढेच नव्हे तर परदेशातूनही काही नागरिकांनी हजेरी लावत गर्दी केली होती. पुष्प चाहत्यांनी खुप गर्दी केल्याचे यावेळी दिसले. हे प्रदर्शन 27 जानेवारी 2025 पर्यंत नागरिकांसाठी खुले असणार आहे.तसेच सोमवार, 27 जानेवारी रोजी सायंकाळी 6.00 वाजता सुनीता कल्याणी यांच्या हस्ते पुष्प प्रदर्शनातील विजेत्यांना पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आले आहे.

प्रदर्शनात विविध फुले, भाजीपाला, बोन्साय अशा स्पर्धा आयोजित केल्या आहेत. यामध्ये नर्सरी, शेतीची अवजारे, खते, कुंड्या, बागकामाचे साहित्य, खाद्यपदार्थ असे विविध स्टॉल आहेत जेथे रौपे, खत, बागकाम साहित्य खरेदी करण्यासही गर्दी दिसून आली. तसेच येथे संस्थेतर्फे काही ठिकाणी सेल्फी पांईट बनविण्यात आले होते, येथेही गर्दी पाहण्यास मिळाली. तसेचे विविध फुलांच्या पाकळ्यांनी स्व. भीमसेन जोशी आणि स्व. लता मंगेशकर यांचे पुष्पचित्र साकारण्यात आले होते, जे पुष्पप्रदर्शनाचे आकर्षण ठरले. हे पुष्पचित्राचे फोटो काढल्याशिवाय कोणाचे पुष्पचित्र आहे हे समजत नाही.


## ग्रामपंचायत कमान, ता. खेड, जि. पुणे

मौजे कमान, ता.खेड, जि.पुणे यांचे तर्फे पुणे जिल्हा परिषद पुणे यांचेकडील नोंदणीकृत ठेकेदार त्यांचेकडून दोन पाकीटे सीलबंद लिफाफा पध्दतीने खालील विकासकामांची निविदा बी-१ मागविण्यात येत आहे.

कोऱ्या निविदेचा नमुना ग्रा.पं. कार्यालय कमान येथे उपलब्ध असून सदर निविदा दि. २९/०१/२०२५ ते ०४/०२/२०२५ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते ०३ या वेळेत उपलब्ध करून देण्यात येतील. व ठेकेदार यांचेकडून पाठविण्यात आलेल्या सीलबंद निविदा सदर कालावधीत स्वीकारण्यात येतील. प्राप्त निविदा शक्य झाल्यास दि. ०४/०२/२०२५ रोजी दुपारी ०४ : ०० वाजता ग्रा.पं. कार्यालय कमान येथे उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निविदा किंमत | कामाचा कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे कमान नालंदानगर येथे भूमिगत गटर बांधणे. | ४९८९७६/- | १% | ५००/- | ३ महिने | |

नियम व अटी : १) जि.प.पुणे अथवा तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणीकृत ठेकेदार प्रमाणपत्र असणे बंधनकारक राहील. २) तीन वर्षांचे आय.टी.आर रिटर्न व जीएसटी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. ३) सदर निविदा बी-१ फॉर्म परिपूर्ण भरणे बंधनकारक राहील. ४) इसार/निविदा फी धनाकर्ष/ डीडी स्वरूपात ग्रा.पं. लेखासंहिता २०११ नुसार नावाने जमा करणे बंधनकारक राहील. ५) सदर काम व त्याचा ठेका रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार सरपंच ग्रामपंचायत कमान यांना राहतील.

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कमान, ता. खेड, जि. पुणे

सही/-
सरपंच,
ग्रामपंचायत कमान, ता. खेड, जि. पुणे

## थोडक्यात



### सनसिटी रोड ज्येष्ठ नागरिकांचे विविध गुणदर्शन

पुणे (आरंभ पर्व) : सनसिटी रोड ज्येष्ठ नागरिक संघात सभासदांचा विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाची सुरुवात सचिव साळूंखे यांनी विश्वप्रार्थनेनी केली. त्यांच्या व अध्यक्ष सुरेश कट्टे यांचे हस्ते या महिन्यात वाढदिवस असलेल्या सभासदांचा सत्कार झाला. कार्यक्रमास सुरुवात मिनल कुलकर्णी यांच्या गणेशवंदना करून केली. विजय सबनीस यांनी संघातील सांस्कृतिक मंचाची गरज याबद्दल मार्गदर्शन केले. अपर्णा तळेगावकर व मंजिरी धर्माधिकारी यांनी स्वरचित कविता, हेमंत काळे व अजितकुमार जोशी यांनी गाणी, प्रभाकर पाटील यांनी नव्या म्हणी व कोडी, दीपक खरे व दत्तात्रय कुलकर्णी यांनी शिक्षक -पालक संवाद, प्राजक्ता कुलकर्णी यांनी विनोद, अध्यक्ष सुरेश कट्टे यांनी AI बाबत माहिती सांगितली. सुषमा लेले यांनी कविता तर वृंदा कुलकर्णी, रोहिणी पेंढारकर, छाया करमरकर यांनी रामलल्ला मंदिर प्रतिष्ठापना वर्षपूर्तीचे गाणे गायले. मालती कुलकर्णी, उषा ढोरे, सुनिता कुलकर्णी, वर्षा लोथे, सुमन येरंदे यांनी भारूड सादर केले. कार्यक्रमाची सांगता नेहा खरे यांचे भैरवीने झाली. कार्यक्रमाचा शेवट पसायदानाने झाला.

### ‘म्हाडा’चे घर मिळवून देण्याच्या बहाण्याने ६०० जणांची फसवणूक



पिंपरी (आरंभ पर्व) : महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागात पूर्वी कंत्राटी कामगार म्हणून कामाला असलेल्या एका तरुणाने म्हाडात सदनिका मिळवून देण्याच्या बहाण्याने ६०० लोकांची २२ लाख ४१ हजार ७६० रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. प्रतीक राजेश धाईंजे (वय २५, रा. भोसरी) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी एका व्यक्तीने भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रतीक याचे बारावीपर्यंतचे शिक्षण झाले आहे. तो पूर्वी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पाठीपुरवठा विभागात कंत्राटी कामगार म्हणून काम करत होता. माझी महापालिकेत ओळख आहे. म्हाडात सदनिका मिळवून देतो, असे त्याने नागरिकांना सांगितले. म्हाडाच्या अर्जाच्या नावाखाली प्रत्येकी १५ हजार रुपये घेतले. तसेच म्हाडाचे घर लागल्यानंतर प्रत्येकी दोन लाख रुपये देण्याचे नागरिकांकडून मान्य करून घेतले. ६०० लोकांनी प्रतीककडे अर्जासाठी पैसे दिले. त्याने म्हाडाचे बनावट ‘लेटरहेड’ तयार केले. त्यावर म्हाडाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नावाने बनावट दस्तऐवज तयार करून काही नागरिकांना दिले. तसेच म्हाडाची लॉटरी निघणार, यादी येणार, तुमचे नाव नक्की घेतले आहे, अशी कारणे सांगून लोकांना पुढची तारीख देऊन चालढकल केली. अशा प्रकारे फसवणूक होत असल्याबाबत पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखा युनिट एकचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास आव्हाड यांना माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी प्रतीक याला शोधून अटक केली. म्हाडाचे घर देण्याच्या नावाखाली पैसे घेऊन नागरिकांची फसवणूक केल्याचे त्याने मान्य केल्याचे पोलिसांनी सांगितले. भोसरी पोलीस तपास करीत आहेत.

# मैदान व्यासपीठाकडून सर्वोत्कृष्ट शाळांचा सन्मान



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

इंटरस्कूल ऑनलाइन क्विझिंग स्पर्धांसाठी प्रसिद्ध असलेल्या मैदान व्यासपीठाकडून दि. २३ जानेवारी २०२५ रोजी द फर्न रेसिडेन्सी, एमआयडीसी येथे भव्य पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मैदान व्यासपीठाचा झपाट्याने विकास होण्यास योगदान दिलेल्या स्कूल लीडर्स आणि आघाडीच्या शाळांच्या कामगिरीचा गौरव करण्यात आला. पुणे शहरातील ६५ पेक्षा अधिक सहभागी शाळांबरोबर मैदान व्यासपीठाने १२,००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना मासिक ऑनलाइन क्विझिंग स्पर्धांमध्ये आपले कौशल्य सादर करण्याची संधी दिली आहे.

सदर पुरस्कार तीन प्रमुख श्रेणींमध्ये प्रदान करण्यात आले. डोमेन एक्सलन्स या पुरस्काराने इंग्रजी, गणित, सामान्य ज्ञान व विज्ञान यांसारख्या विषयांमध्ये मैदान व्यासपीठाने आयोजित केलेल्या स्पर्धांमध्ये सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या शाळांचा गौरव करण्यात आला. यात जीके गुरुकुलने सर्वसाधा विजेतेपद पटकावले. मेरिट रँकर्स श्रेणीत पीसीएमसी क्षेत्रातील सर्वाधिक मेरिट पुरस्कार जिंकणाऱ्या शाळांचा सन्मान करण्यात आला, यात ब्लू रिज पब्लिक स्कूलने अव्वल क्रमांक मिळवला. तसेच, चॅम्पियन्स माइंडसेट पुरस्कार सर्व विषय व वर्गांमधील जास्तीत जास्त सहभागी विद्यार्थ्यांसाठी देण्यात आला, यात मोतीलाल तळेरा इंग्लिश मीडियम स्कूल विजयी ठरले.

“हजारो विद्यार्थ्यांच्या कष्ट आणि निष्ठेचा सन्मान पाहणे खरोखरच प्रेरणादायी होते. स्कूल लीडर्स यांनी आपल्या संस्थांमध्ये मैदान व्यासपीठाने घडवलेल्या सांस्कृतिक परिवर्तनाचे कौतुक केले. या व्यासपीठामुळे विद्यार्थ्यांना आपल्या मर्यादांच्या पलीकडे जाऊन वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी प्रोत्साहन मिळाले असून, अपयशाची भीती दूर सारण्याचा आत्मविश्वास निर्माण झाला आहे,” असे मैदान व्यासपीठाचे सह-संस्थापक जुधाजित बाळ यांनी सांगितले.

सदर कार्यक्रम शिक्षण क्षेत्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी कार्यरत असलेल्या स्कूल लीडर्सच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी आयोजित करण्यात आला होता. पीसीएमसी भागातील २५ प्रमुख शाळांचे प्राचार्य आणि स्कूल लीडर्स मैदान व्यासपीठाच्या २०२४-२०२५ शैक्षणिक वर्षातील स्पर्धांमधील सर्वोत्कृष्ट शाळांचा सन्मान करण्यासाठी उपस्थित होते.

# फरार सुशांत कुटे गजाआड

## पेट्रोल चोरीच्या संशयातून केला होता तरुणाचा खून


सुशांत कुटे (माजी उपसरपंच) | समर्थ नेताजी भगत (मृत)

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पेट्रोल चोरीच्या संशयातून तरुणाला बेदम मारहाण करुन त्याचा खून करण्यात आल्याची घटना नऱ्हे भागात घडली होती. खून प्रकरणात गेले दोन महिने पसार असलेल्या नऱ्हेतील माजी उपसरपंचाला सिंहगड रस्ता पोलिसांनी अटक केली. याप्रकरणात यापूर्वी तिघांना अटक करण्यात आली होती.

याप्रकरणी नऱ्हे गावचा माजी उपसरपंच सुशांत कुटे याला अटक करण्यात आली. यापूर्वी खून प्रकरणात गौरव संजय कुटे (वय २४), अजिंक्या चंद्रकांत गांडले (वय २०), राहुल सोमनाथ लोहार (वय २३, तिघे रा. मानाजीनगर, नऱ्हे) यांना अटक करण्यात आली होती. पेट्रोल चोरीच्या संशयातून आरोपींनी समर्थ नेताजी भगत (वय २०, रा. व्यंकटेश्वरा सोसायटी, अभिनव कॉलेज रस्ता, नऱ्हे) याला बेदम मारहाण करुन त्याचा खून केला होता. याबाबत समर्थचे वडील नेताजी (वय ५१, रा. सिंहगड रस्ता) यांनी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

नेताजी एका कंपनीत वाहनचालक आहेत. त्यांचा मुलगा समर्थ खासगी कंपनीत कामाला होता. २५ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास समर्थला आरोपींनी पेट्रोल चोरीच्या संशयातून आरोपी कुटे, गांडले, लोहार यांनी बेदम मारहाण केली.

समर्थने वडिलांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधून या घटनेची माहिती दिली होती. नेताजी तेथे पोहोचले. त्यावेळी समर्थ जखमी अवस्थेत तेथे पडला होता. तेथे नागरिकांची गर्दी झाली होती. त्यांनी समर्थला खासगी रुग्णालयात दाखल केले. उपचारादरम्यान गंभीर जखमी झालेल्या समर्थचा मृत्यू झाला.

खून प्रकरणात सुरुवातीला तीन आरोपींना अटक करण्यात आली होती. नऱ्हे गावाचा माजी उपसरपंच सुशांत कुटे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल केल्यानंतर तो पसार झाला होता. पसार झालेल्या आरोपी सुशांतला अटक करण्यात आली. न्यायालयाने त्याला पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप दाईंगडे, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उत्तम भजनावळे यांनी ही कारवाई केली.

# दारू पिताना झालेल्या वादातून तरुणाचा खून

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दारू पिताना झालेल्या वादातून तरुणाच्या डोक्यात सिमेंटचा गट्टू घालून खून करण्यात आल्याची घटना कोंढवा भागात सोमवारी घडली. याप्रकरणी पोलिसांनी दोघांना अटक केली. मल्लेश कुपिंद्र कोळी (वय ३२, रा. आर. के. कॉलनी, गोकुळगनर, कोंढवा) असे खून झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी बारिश उर्फ बाऱ्या संजय खुडे (वय २१, रा. भैरवनाथ मंदिराजवळ, कोंढवा खुर्द), आकाश सुभाष मानकर (वय २३, रा. आर. के. कॉलनी, गोकुळनगर, कोंढवा) यांना अटक करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मल्लेश कोळी आणि आरोपी बारिश खुडे, आकाश मानकर ओळखीचे आहे. सोमवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास कोंढव्यातील दशक्रिया विधी घाटावर तिघे जण दारू पित होते. दारू पिताना त्यांच्यात वाद झाला. वादातून दोघांनी मल्लेशला काठीने बेदम मारहाण केली.



# नवीन रुग्णांची वाढ नाही

## ‘जीबीएस’चा आकडा ७३ वर, १४ व्हेंटिलेटरवर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे-पिंपरी चिंचवड शहरासह जिल्ह्यातील ‘गुलियन बॅरी सिंड्रोम (जीबीएस) रुग्णांच्या संख्येत शनिवारी वाढ झाली नाही. रुग्णसंख्या 73 वर स्थिर आहे. तर 14 रुग्ण कृत्रिम श्वासोच्छवास (व्हेंटिलेटर) यंत्रणेवर आहेत. दरम्यान, शनिवारी 9 संशयित रुग्ण आढळले आहेत. दरम्यान पुण्यात अजून यामुळे मृत्यूची नोंद झालेली नाही.

जीबीएस आढळलेल्या 23 रुग्णांचे रक्ताचे नमुने राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेकडे (एनआयव्ही) तपासणीसाठी पाठवले होते. त्यांचे अहवाल प्राप्त झाले असून सर्व नमुन्यांमध्ये झिका, डेंगी, चिकुनगुनिया चे विषाणू आढळलेले नाहीत. याआधी 11 जणांचे शौच नमुने तपासणीसाठी ‘एनआयव्ही’ कडे पाठवले होते.

त्यांचे अहवाल आले असून त्यापैकी 9 नमुन्यांमध्ये नोरोव्हायरस आढळला. हेच 11 नमुने पुढे जीवाणूंच्या (बॅक्टेरिया) तपासणीसाठी पाठवले असता त्यापैकी 3 शौच नमुन्यांमध्ये ‘कॅम्पिलोबॅक्टर जेजुनी चे जीवाणू आढळले तर पाच मध्ये काही सापडले नाही.

### सिंहगड रस्त्यावर रुग्णांची संख्या सर्वाधिक

| पुणे शहर | ग्रामीण |
|---|---|
| बाजीराव रस्ता - 1 | किरकटवाडी - 14 |
| पर्वती दर्शन - 1 | नांदेड सिटी - 7 |
| माणिक बाग, सिंहगड रस्ता - 4 | कोल्हेवाडी - 1 |
| दांडेकर पूल - 1 | खडकवासला - 6 |
| धायरी - 3 | नांदेड फाटा - 2 |
| संतोषनगर, कात्रज - 1 | आंबेगाव - 1 |
| एकूण - 11 | डीएसके विश्व - 8 |
| | नांदेड गाव - 4 |
| | वाघोली - 1 |
| | एकूण - 44 |

| पिंपरी चिंचवड - | |
|---|---|
| संत तुकाराम नगर - 1 | पत्ता नसलेले - 3 |
| थेरगाव - 2 | चिंचवड - 1 |
| पिंपरी - 1 | एकूण - 15 |
| इंद्रायणीनगर, भोसरी - 3 | इतर जिल्हे - |
| पिंपळे गुरव - 2 | धाराशिव - 1 |
| चिखली - 1 | सोलापुर - 1 |
| केळगाव केढ - 1 | उडूपी कर्नाटक - 1 |
| | एकूण - 3 |

# 'आर्यन्स सन्मान २०२४' पुरस्कार सोहळा दिमाखात संपन्न

## 'एक दोन तीन चार' या चित्रपटासह 'आज्जी बाई जोरात' आणि 'घंटा घंटा घंटा घंटा घंटा' या नाटकांनी मारली बाजी...




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

'वारसा परंपरेचा... अभिमान संस्कृतीचा!' या घोषवाक्यासह मनोरंजन विश्वातील मान्यवरांच्या कर्तृत्वाला सलाम आणि त्यांच्या कार्याचा सन्मान करणारा 'आर्यन्स सन्मान पुरस्कार सोहळा' संपन्न झाला. पुणे येथील स्वारगेटमधील गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य-दिव्य दिमाखदार सोहळ्यात विजेत्यांना 'आर्यन्स सन्मान २०२४' प्रदान करण्यात आले. या सोहळ्याला मराठी मनोरंजन विश्वातील मकरंद अनासपुरे, सुनील बर्वे, निर्मिती सावंत, सयाजी शिंदे, संदीप पाठक, आनंद इंगळे, सावनी रविंद्र, शैलेश दातार, अशोक समर्थ, पूजा पवार, उमा सरदेशमुख, मिलिंद फाटक, जगन्नाथ निवंगुणे, मिलिंद शिंतरे, अंशुमन विचारे, सुवेधा देसाई, हेमंत पाटील, प्रसाद वनारसे, निपुण धर्माधिकारी, देवेंद्र पेम, राहुल रानडे, निर्मात्या अमृता राव, सुरेश देशमाने, दीपक देवराज (महाराष्ट्र आर्थिक गुन्हे विभाग आयुक्त) आदी दिग्गज मंडळी उपस्थित होती. मुख्य चित्रपट, व्यावसायिक नाटक आणि प्रायोगिक नाटकाला १ लाख रुपये, तर तंत्रज्ञांसह इतर २५ हजार रुपये रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. पुरस्कारांची एकूण रक्कम १३ लाख रुपये ओमा फाऊंडेशनकडून वितरित करण्यात आली.

या सोहळ्यात आर्यन ग्रुप ऑफ कंपनीजचे सीईओ मा. मनोहर जगताप यांनी मनोरंजन विश्वाशी निगडीत असलेल्या तीन घोषणा केल्या. ६ फेब्रुवारीपासून शहाण्या लोकांनी बनवलेला 'इडियट बॉक्स' हे मनोरंजनपर ॲप सुरू करण्यात येणार आहे. चित्रपटसृष्टीतील कलाकार-तंत्रज्ञांना आर्यन्स ग्रुपच्या कोल्हापूर आणि पुणे येथे सुरू होणाऱ्या रुग्णालयांमध्ये मोफत उपचार करण्यात येतील. याखेरीज यंदा साहित्यिकांसाठी आर्यन्स सन्मान पुरस्कार आयोजित करण्यात येणार आहे. यंदा पुरस्कार सोहळ्यात सहभागी झालेल्या प्रेक्षकांमधून लकी-ड्रॉ द्वारे निवडण्यात आलेल्या पाच भाग्यवान प्रेक्षकांना ३० ऑगस्ट २०२५ रोजी सिंगापूरमध्ये संपन्न होणाऱ्या तिसऱ्या आर्यन्स सन्मान पुरस्कारासाठी नेण्यात येणार आहे.

या सोहळ्यात चित्रपट विभागात 'एक दोन तीन चार' या चित्रपटाने सर्वोत्कृष्ट चित्रपटावर आपले नाव कोरले. 'श्यामची आई' चित्रपटासाठी गौरी देशपांडेने सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा, तर 'एक दोन तीन चार'साठी निपुण धर्माधिकारीने सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार आपल्या नावे केला. याखेरीज लक्षवेधी अभिनेता संदीप पाठक (श्यामची आई), लक्षवेधी अभिनेत्री नम्रता संभेराव (नाच गं घुमा), सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री नीता शेंडे (बापल्योक), सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता प्रियदर्शन जाधव (शक्तिमान), सर्वोत्कृष्ट बालकलाकार शर्व गाडगीळ (श्यामची आई), सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक वरुण नार्वेकर (एक दोन तीन चार), सर्वोत्कृष्ट संवाद विवेक बेळे (अलीबाबा आणि चाळीशीतले चोर), सर्वोत्कृष्ट पटकथा वरुण नार्वेकर-निपुण धर्माधिकारी, सर्वोत्कृष्ट कथा विवेक बेळे (अलीबाबा आणि चाळीशीतले चोर), सर्वोत्कृष्ट गायिका रुचा बोंद्रे (श्यामची आई), सर्वोत्कृष्ट गायक दिव्य कुमार (नवरदेव बीएससी. ॲग्री.), सर्वोत्कृष्ट गीतकार गुरू ठाकूर (बापल्योक), सर्वोत्कृष्ट संगीत आदित्य बेडेकर (शक्तिमान), सर्वोत्कृष्ट पार्श्वसंगीत आदित्य बेडेकर (शक्तिमान), सर्वोत्कृष्ट छायाचित्रण गौरव पोंक्षे (शक्तिमान), सर्वोत्कृष्ट संकलन सचिन नाटेकर (स ला ते स ला ना ते), सर्वोत्कृष्ट ध्वनीमुद्रण पियुष शहा (अलीबाबा आणि चाळीशीतले चोर), सर्वोत्कृष्ट वेशभूषा नामदेव वाघमारे (श्यामची आई), सर्वोत्कृष्ट कला दिग्दर्शन योगेश इंगळे (अल्याड पल्याड), सर्वोत्कृष्ट रंगभूषा सौरभ कापडे (स्वरगंधर्व सुधीर फडके) यांनी पुरस्कार पटकावले. सर्वोत्कृष्ट चित्रपट - समीक्षक हा पुरस्कार 'तेरवं' आणि स ला ते स ला ना ते या दोन चित्रपटांना देण्यात आला.

व्यावसायिक नाट्य विभागामध्ये 'आज्जी बाई जोरात' या नाटकाने सर्वोत्कृष्ट नाटकाचा पुरस्कार आपल्या नावे केला. 'नकळत सारे घडले' या नाटकातील भूमिकेसाठी आनंद इंगळे यांनी सर्वोत्कृष्ट अभिनेता, तर 'आज्जी बाई जोरात'मधील निर्मिती सावंत यांनी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार पटकावला. पुरस्कार स्वीकारल्यानंतर व्यासपीठावरूनच निर्मितीताईंनी हा पुरस्कार आपल्या नाटकातील हरहुन्नरी अभिनेता अभिनय बेर्डेसोबत शेअर करत असल्याचे सांगितले.

यासोबतच त्यांनी मनोहर जगताप यांनी केलेल्या घोषणांचे कौतुक केले. यासोबतच सर्वोत्कृष्ट लेखक क्षितीज पटवर्धन (आज्जी बाई जोरात), सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक क्षितीज पटवर्धन (आज्जी बाई जोरात), सर्वोत्कृष्ट विनोदी कलाकार मयूरेश पेम (ऑल दि बेस्ट), लक्षवेधी अभिनेता दिलीप प्रभावळकर आणि विजय केंकरे (पत्रा पत्री), सर्वोत्कृष्ट नेपथ्य संदेश बेंद्रे (चाणक्य), सर्वोत्कृष्ट संगीत सौरभ भालेराव आणि क्षितीज पटवर्धन (आज्जी बाई जोरात), सर्वोत्कृष्ट प्रकाश योजना प्रदीप मुळ्ये (आज्जी बाई जोरात), सर्वोत्कृष्ट वेशभूषा नीरजा पटवर्धन (चाणक्य), सर्वोत्कृष्ट रंगभूषा कमलेश बीचे (चाणक्य) यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्रायोगिक नाट्य विभागामध्ये 'घंटा घंटा घंटा घंटा घंटा' या नाटकाने सर्वोत्कृष्ट नाटकाचा पुरस्कार आपल्या नावे केला. 'घंटा घंटा घंटा घंटा घंटा' या नाटकातील भूमिकेसाठी ललित प्रभाकरला सर्वोत्कृष्ट अभिनेता, तर 'घंटा घंटा घंटा घंटा घंटा'मधील मल्लिका सिंग हंसपाल, 'तुजी औकात काये?' मधील भूमिकेसाठी प्रतिक्षा खासनीस आणि निकिता ठुबे यांनी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार पटकावला.

**पुरस्कार सोहळ्यात सादर केलेल्या गीत-नृत्याद्वारे भालजी पेंढारकरांपासून सचिन पिळगांवकरांपर्यंतच्या सुवर्णकाळाला मानवंदना देण्यात आली. यात वैदेही परशुरामी, मृण्मयी देशपांडे, मीरा जोशी, पुष्कर जोग, अंकित मोहन, प्रथमेश परब, गिरीजा प्रभू, समृद्धी केळकर, श्वेता खरात, जुई बेंडखळे, अस्मिता चिंचाळकर या कलाकारांनी जुन्या गाजलेल्या गाण्यांवर नृत्य सादर करत रसिकांची दाद मिळवली. अभिनेता अभिजीत खांडकेकर आणि डॉ. श्वेता पेंडसे यांनी या सोहळ्याचे सूत्रसंचालन केले. रेड कार्पेट वर आरजे बंड्या ने उपस्थित कलाकार आणि पुरस्कार विजेत्यांशी संवाद साधला. श्रीनिवास भणगे, हेमंत देवधर, राहुल रानडे, सौमित्र पोटे, अभिजित अब्दे यांनी सिनेपरीक्षक, तर अजित भुरे, रवींद्र पाथरे, राजू जोशी, महेंद्र सुके, प्रदीप वैद्य यांनी नाट्यपरीक्षक म्हणून काम पाहिले. राज काजी या सोहळ्याचे जुरी समन्वयक होते.**

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.